IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# पुर्व भारतातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील आचार्य पदवी प्राप्त शोधप्रबंधांचा आशय विश्लेषणात्मक अभ्यास

मुग्धा राजनकर, डॉ. शालीनी साखरकर

सहायक प्राध्यापक, ग्रंथपाल
ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग

कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर, भारत

**सारांश :**

प्रस्तुत संशोधन लेखात ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या आतंरविद्याशाखेय विषयात आचार्य पदवी करिता भारतातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील आचार्य पदवी प्राप्त शोधप्रबंधाचा आशय विश्लेषणात्मक अभ्यास या विषयावरिल अंश सादरीकरण म्हणून **"पुर्व भारतातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील आचार्य पदवी प्राप्त शोधप्रबंधाचा आशय विश्लेषणात्मक अभ्यास – भाग १"** यावर लिखाण केले आहे. प्रस्तुत लेखाकरिता आवश्यक तथ्ये "शोधगंगा - ए रिर्झव्ह ऑफ़ इंडीयन थिसिस" या संकेतस्थळावरुन संकलित करण्यात आलेले आहे. पुर्व भारतात ओरिसा आणि पश्चिम बंगाल या दोन राज्यात ९ राज्यस्तरीय व १ केंद्रस्तरीय विद्यापीठ असे एकुण १० विद्यापीठात ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात आचार्य पदवी आहे. २००१ ते २०२२ या कालावधीत राज्यस्तरीय विद्यापीठ स्तरावरील ९ विद्यापीठात ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील आचार्य पदवी प्राप्त शोधप्रबंध उपलब्ध आहे. या शोधप्रबंधाचा अभ्यास करुन ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील संशोधन कार्याचे वर्षेनिहाय वर्गीकरण, मार्गदर्शकांचे संशोधन कार्यातील योगदान, भाषेनुसार शोधप्रबंध संख्या, संशोधकांचे लिंगनिहाय वर्गीकरण, इ. मुद्यावर प्रस्तुत संशोधन लेखात आशय सादर केला आहे.

**कि – वर्ड** : पुर्व भारत, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र, शोधप्रबंध, आशयविश्लेषण

**प्रस्तावना :**

विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारा भारतात १०२२ विद्यापीठ (यु.जी.सी.संकेतस्थळ २४/१२/२०२१नुसार) आहे. त्यात ११८ विद्यापीठात ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात आचार्य पदवीद्वारे संशोधन कार्य पार पाडले जाते.

**साहित्याचा आढावा :**

प्रस्तुत विषयाला अनुषंगुन साहित्याचा आढावा घेतला असता पुर्व भारतातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील संशोधन कार्याबद्दल पुढील साहित्य उपलब्ध झाले. त्या शोधप्रबंध साहित्यात उल्लेखित माहितीचा आढावा पुढील प्रमाणे आहे.

१. पी. एस. जी. कुमार यांनी Doctoral Studies in Library And Information Science in India या विषयावर DESIDOC Bulletin of Information Technology, Vol. 18, No. 1, या नियतकालीकेतून जानेवारी १९९८ साली पृष्ठ क्रं. ५-९ यात संशोधन लेख प्रस्तूत केलेला अहे. त्यांच्या संशोधन लेखातून १९५० ते १९९७ या कालावधीमधील भारतातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील आचार्य पदवी संशोधन कार्याचा अभ्यास केलेला आहे. त्यांनी आपल्या संशोधन कार्यात कालक्रम, संशोधन विषय, मार्गदर्शकांचे लिंगनिहाय विश्लेषण, विद्यापीठानुसार विश्लेषण, मार्गदर्शकांचे संशोधन कार्यातील योगदान इ. मुद्याचा उल्लेख प्रस्तूत संशोधन लेखात केलेला आहे.

२. R. Madasamy & R. Alwarammal Doctoral यांनी Degrees in Library and Information Science in India during 2003 – 2008 : A Study या विषयावर Annals of Library and Information Studies, vol. 56 या

नियतकालीकामध्ये २६२ – २६६ या पृष्ठ क्रमांकावर प्रस्तुत संशोधन लेख प्रकाशीत केलेला आहे. यांच्या संशोधन लेखातून २००३ ते २००८ या कालावधीतील भारतामधील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील आचार्य पदवी संशोधन कार्याचा आढावा घेतलेला आहे. या संशोधन लेखात आचार्य पदवीतील संशोधन कार्याचे कालक्रमानुसार, भारतातील राज्यानुसार, मार्गदर्शकांचे योगदान, विद्यापीठानुसार, विषयनिहाय संशोधन कार्याचा अभ्यास केलेला आहे.

३. संगिता पालिवाल यांनी Phd Degree awarded during 2006 to 2012 in library and information science in India या विषयावर International journal of Information Resources and Knowladge Management या नियतकालीकेतून जानेवारी – जून २०१४ या वर्षी ८१ – ८८ या पृष्ठ क्रमांकावर प्रस्तुत संशोधन लेख प्रस्तुत केलेला आहे. Association of Indian Universities द्वारा प्रकाशीत Universities News या साप्ताहिकमधील Thesis of Month या सदरातंर्गत प्रकाशीत आचार्य पदवी प्राप्त ग्रंथसुचीय माहितीच्या आधारे भारतातील २००६ ते २०१२ या कालावधीतील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील आचार्य पदवीचा आढावा घेतला आहे. या संशोधन लेखात आचार्य पदवीतील संशोधन कार्याचे कालक्रमानुसार, भारतातील राज्यानुसार, मार्गदर्शकांचे योगदान, विद्यापीठानुसार, विषयनिहाय संशोधन कार्याचा अभ्यास केलेला आहे.

**व्याप्ती व मर्यादा :**

प्रस्तुत संशोधन लेख पुर्व भारतातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील आचार्य पदवी प्राप्त शोधप्रबंधाचा आशय विश्लेषणात्मक अभ्यास करण्यापुरता मर्यादित आहे.

**उद्देश :**

प्रस्तुत संशोधन लेखात पुढील उद्देश मांडण्यात आलेले आहे.

१. भारतातील विद्यापीठाच्या प्रकारानुसार ग्रं. आणि म. शास्त्र विषयात आचार्य पदवी प्रदान करणा-या विद्यापीठांची संख्यात्मक माहितीचा शोध घेणे.
२. भारतातील प्रदेश व विद्यापीठ प्रकारानुसार ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात आचार्य पदवी असलेल्या विद्यापीठाची संख्यात्मक माहितीचा शोध घेणे.
३. भारतातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील शोध प्रबंधाची संख्यात्मक माहितीचा शोध घेणे.
४. पुर्व भारतातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील आचार्य पदवी प्राप्त शोधप्रबंधाचा आशय विश्लेषणात्मक अभ्यास करण्याकरिता पुढील उद्देश मांडण्यात आलेले आहे.
    १. विद्यापीठ प्रकारानुसार शोधप्रबंधाची संख्यात्मक माहिती घेणे.
    २. आचार्य पदवी प्राप्त शोधप्रबंधाचे भाषेनुसार वर्गीकरण करणे.
    ३. कालक्रमानुसार संशोधन कार्यातील उत्पादकता अभ्यासणे.
    ४. संशोधन कार्यातील मार्गदर्शकांचे योगदान अभ्यासणे.
    ५. संशोधकांचे लिंगनिहाय वर्गीकरण करणे.

**तथ्य संकलन पध्दत व तंत्रे :**

प्रस्तुत लेखाकरिता दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. आंतरजाळयाच्या माध्यमातून विद्यापीठ अनुदान आयोग व "शोधगंगा - ए रिर्झव्ह ऑफ़ इंडीयन थिसिस" या दोन संकेतस्थळावरुन तथ्ये संकलित करण्यात आलेले आहे.

**तथ्य विश्लेषण व तंत्रे :**

प्रस्तुत संशोधन लेखात संकलीत माहितीचे विश्लेषण लेखी आणि तक्त्यास्वरुपात करण्यात आलेले आहे.

**संकलित माहितीचे विश्लेषण व सादरीकरण :**

**तक्ता क्रं. १** : भारतातील विद्यापीठाच्या प्रकारानुसार ग्रं. आणि म. शास्त्र विषयात आचार्य पदवी प्रदान करणाऱ्या विद्यापीठांची संख्यात्मक माहिती दर्शविणारा तक्ता (यु.जी.सी.संकेतस्थळ २४/१२/२०२१नुसार)

| अनु. क्रं. | विद्यापीठाचा प्रकार | भारतातील एकुण विद्यापीठ संख्या | भारतातील ग्रं. आणि मा. शास्त्र विषयात आचार्य पदवी प्रदान विद्यापीठांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | केंद्रिय विद्यापीठ | ५४ | १३ |
| २ | राज्य विद्यापीठ | ४४३ | ७४ |
| ३ | डीम्ड विद्यापीठ | १२६ | ११ |
| ४ | राज्य खाजगी विद्यापीठ | ३९९ | २० |
| | एकूण | १०२२ | ११८ |

वरील तक्त्यावरुन असे निरिक्षणास येते, विद्यापीठ अनुदान आयोगातर्गत भारतात एकुण १,०२२ विद्यापीठ आहे. त्यात ५४ केंद्रिय विद्यापीठ, ४४३ राज्य विद्यापीठ, १२६ डीम्ड विद्यापीठ आणि ३९९ खाजगी राज्य विद्यापीठ आहे. त्यातील १३ केंद्रिय विद्यापीठ, ७४ राज्यस्तरीय विद्यापीठ, ११ डीम्ड विद्यापीठ आणि २० खाजगी राज्यस्तरीय विद्यापीठातून ग्रंथालय आणि महितीशास्त्र विषयात आचार्य पदवी प्रदान केली जाते.

**तक्ता क्रं.२** : भारतातील प्रदेश व विद्यापीठ प्रकारानुसार ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात आचार्य पदवी असलेल्या विद्यापीठाची संख्या दर्शविणारा तक्ता –

| अनु. क्रं. | प्रदेश | विद्यापीठ प्रकारानुसार विद्यापीठ संख्या | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | राज्य | केंद्रिय | डिम्ड | खाजगी | |
| १ | पुर्व भारत | ०९ | ०१ | ०० | ०० | १० |
| २ | पश्चिम भारत | २५ | ०२ | ०३ | ०७ | ३७ |
| ३ | दक्षिण भारत | २५ | ०२ | ०६ | ०२ | ३५ |
| ४ | उत्तर भारत | १४ | ०४ | ०२ | ११ | ३१ |
| ५ | उत्तर – पुर्व भारत | ०१ | ०४ | ०० | ०० | ५ |
| | | ७४ | १३ | ११ | २० | ११८ |

वरील तक्त्यावरुन असे निरिक्षणास येते, भारतातील प्रदेशानुसर भारतात एकुण ११८ विद्यापीठातून ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात आचार्य पदवी दिली जाते. पश्चिम भारतात ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात आचार्य पदवी विद्यापीठांची संख्या सर्वात अधिक ३७ आहे. त्याखालोखाल दक्षिण भारतात ३५ विद्यापीठ, उत्तर भारतात ३१ विद्यापीठ, पुर्व भारतात १० विद्यापीठ आणि सर्वात कमी ५ विद्यापीठ उत्तर पुर्व भारतात आहे.

भारतातील पुर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण व उत्तर – पुर्व प्रदेशात समाविष्ठ सर्वात जास्त ७४ राज्य स्तरीय विद्यापीठ प्रकारात ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात आचार्य पदवी उपलब्ध आहे. त्याखालोखाल २० राज्य खाजगी विद्यापीठ, १३ केंद्रिय विद्यापीठ आणि ११ डिम्ड विद्यापीठामध्ये ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात आचार्य पदवी आहे.

**तक्ता क्रं. ३** : भारतातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील शोध प्रबंधाची संख्यात्मक माहिती दर्शविणारा तक्ता

| अनु. क्रं. | भारतातील प्रदेश | शोधप्रबंध संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पुर्व भारत | २०३ | १०.८५ % |
| २ | पश्चिम भारत | ५१२ | २७.३६ % |
| ३ | दक्षिण भारत | ६११ | ३२.६३ % |
| ४ | उत्तर भारत | २१५ | ११.४८ % |
| ५ | उत्तर पुर्व भारत | ३३१ | १७.६८ % |
| | एकुण | १,८७२ | १०० % |

वरिल तक्तावरुन असे निरिक्षणास येते, सर्वात जास्त शोध प्रबंध संख्या दक्षिण भारतात ३२.६३ % (६११) आहे. त्या पाठोपाठ अनुक्रमे पश्चिम भारतात २७.३६ % (५१२), उत्तर पुर्व भारतात १७.६८ % (३३१), पुर्व भारतात १०.८५ % (२०३) आणि उत्तर भारतात ११.४८ % (२१५) शोध प्रबंध आहे.

प्रस्तुत संशोधन लेखामध्ये २००१ ते २०२२ या कालावधीत विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारा संचालित इन्फ़्लिबनेट संकेतस्थळावर उपलब्ध "शोधगंगा – ए रिझर्व्ह ऑफ़ इंडियन थिसिस" मधून पुर्व भारतातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील आचार्य पदवी प्राप्त शोधप्रबंधाचा आढावा घेण्यात आला व संकलीत माहितीचे वर्गीकरण पुढील प्रमाणे करण्यात आलेले आहे.

**तक्ता क्रं.** ४ : विद्यापीठ प्रकारानुसार पुर्व भारतातील शोधप्रबंध संख्या दर्शविणारा तक्ता

| अनु. क्रं. | राज्याचे नाव | विद्यापीठाचे नाव | विद्यापीठाचा प्रकार व शोधप्रबंध संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | राज्य स्तरीय वि. | केंद्रिय वि. | डीम्ड वि. | खाजगी वि. |
| १ | ओरिसा | गंगाधर मेहर विद्यापीठ | ०१ | -- | -- | -- |
| २ | | संभलपूर विद्यापीठ | २५ | -- | -- | -- |
| ३ | | उत्कल विद्यापीठ | ०९ | -- | -- | -- |
| ४ | पश्चिम बंगाल | जाधवपूर विद्यापीठ | ६३ | -- | -- | -- |
| ५ | | रबिंद्र भारती विद्यापीठ | ०७ | -- | -- | -- |
| ६ | | कलकत्ता विद्यापीठ | ३२ | -- | -- | -- |
| ७ | | कल्याणी विद्यापीठ | २३ | -- | -- | -- |
| ८ | | द युनिर्व्हसिटी ऑफ़ बुरडॉन | २८ | -- | -- | -- |
| ९ | | विद्यासागर विद्यापीठ | १५ | -- | -- | -- |
| | | एकुण | २०३ | -- | -- | -- |

वरील तक्त्यावरुन असे निरिक्षणास येते –

१. पुर्व भारतात ओरीसा व पश्चिम बंगाल या दोन राज्यात ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात आचार्य पदवी उपलब्ध आहे.
२. पुर्व भारतातील ओरीसा राज्यात ३ व पश्चिम बंगाल राज्यात ६ विद्यापीठात ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात आचर्य पदवी आहे व सद्यस्थितीत २०३ शोधप्रबंध उपलब्ध आहे.
३. शोधप्रबंधाबद्दल वरिल आकडेवारी लक्षात घेता ओरीसा आणि पश्चिम बंगाल या दोन्ही राज्यातील फ़क्त राज्यस्तरीय विद्यापीठातून ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील आचर्य पदवी प्राप्त शोधप्रबंध उपलब्ध आहे.
४. पुर्व भारतातील पश्चिम बंगाल राज्यात जाधवपूर विद्यापीठात सर्वाधिक ६३ शोधप्रबंध उपलब्ध आहे.

**तक्ता क्रं.** ५ : पुर्व भारतातील विद्यापीठात आचार्य पदवी प्राप्त शोधप्रबंधाचे भाषेनुसार वर्गीकरण –

| अनु. क्रं. | राज्याचे नाव | विद्यापीठाचे नाव | शोधप्रबंधाची भाषा | |
|---|---|---|---|---|
| | | | इंग्रजी | बंगाली |
| १ | ऑरिसा | गंगाधर मेहर विद्यापीठ | ०१ | -- |
| २ | | संबलपूर विद्यापीठ | २५ | -- |
| ३ | | उत्कल विद्यापीठ | ०९ | -- |
| ४ | पश्चिम बंगाल | जाधवपूर विद्यापीठ | ५५ | ०८ |
| ५ | | रबिंद्र टागोर विद्यापीठ | ०६ | ०१ |
| ६ | | कलकत्ता विद्यापीठ | ३२ | -- |
| ७ | | कल्याणी विद्यापीठ | २१ | ०२ |
| ८ | | द युनिर्व्हसिटी ऑफ़ बुरडॉन | २७ | ०१ |
| ९ | | विद्यासागर विद्यापीठ | १५ | - |
| | | एकुण | १९१ | १२ |

वरील तक्तावरुन असे निरिक्षणास येते –

१. पुर्व भारतात ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात आचर्य पदवी प्राप्त शोधप्रबंधापैकी सर्वाधिक १९१ शोधप्रबंध इंग्रजी भाषेतून आहे.

**तक्ता क्रं. ६** : पुर्व भारतातील विद्यापीठात कालक्रमानुसार शोधप्रबंधाबद्दल संख्यात्मक माहिती दर्शविणारा तक्ता -

| अनु. क्रं. | वर्ष | ओरीसा | पश्चिम बंगाल | एकुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २००१ ते २००४ | १२ | ०९ | २१ | १०.३४% |
| २ | २००५ ते २००८ | ०६ | २० | २६ | १२.८०% |
| ३ | २००९ ते २०१२ | ०८ | २७ | ३५ | १७.२४% |
| ४ | २०१३ ते २०१६ | ०७ | ४३ | ५० | २४.६३% |
| ५ | २०१७ ते २०२० | ०२ | ६७ | ६९ | ३३.९९% |
| ६ | २०२१ ते २०२२ | ०० | ०२ | ०२ | ०.९८% |
| | एकुण | ३५ | १६८ | २०३ | १००% |

वरील तक्त्यावरुन असे निरिक्षणास येते,

१. २००१ ते २०२२ या कालावधीत ओरीसा आणि पश्चिम बंगाल या दोन्ही राज्य मिळून २०३ शोधप्रबंध उपलब्ध आहे.

२. २००१ ते २०२२ या कालावधीत पश्चिम बंगाल राज्यात सर्वात अधिक १६८ शोधप्रबंध उपलब्ध आहे.

३. २०१७ ते २०२० या कालावधीत पश्चिम बंगाल राज्यात सर्वात अधिक ६७ शोधप्रबंध उपलब्ध आहे.

**तक्ता क्रं. ७** : पुर्व भारतातील विद्यापीठात संशोधन कार्यात मार्गदर्शकांचे योगदान दर्शविणारा तक्ता –

| अनु. क्रं. | राज्य | विद्यापीठाचे नाव | एक मार्गदर्शक | दोन मार्गदर्शक |
|---|---|---|---|---|
| १ | ओरिसा | गंगाधर मेहर विद्यापीठ | ०१ | -- |
| २ | | संबलपूर विद्यापीठ | २५ | -- |
| ३ | | उत्कल विद्यापीठ | ०९ | -- |
| ४ | पश्चिम बंगाल | जाधवपूर विद्यापीठ | ४१ | २२ |
| ५ | | रबिंद्र टागोर विद्यापीठ | ०७ | -- |
| ६ | | कलकत्ता विद्यापीठ | २५ | ०७ |
| ७ | | कल्याणी विद्यापीठ | १९ | ०४ |
| ८ | | द युनिव्हर्सिटी ऑफ़ बुरडॉन | २४ | ०४ |
| ९ | | विद्यासागर विद्यापीठ | १२ | ०३ |
| | | एकुण | १६३ | ४० |

वरील तक्त्यावरुन असे निरिक्षणास येते,

१. पुर्व भारतात एक मार्गदर्शकांनी १६३ आणि दोन मार्गदर्शकांनी ४० संशोधकांना मार्गदर्शन करुन संशोधन कार्यात योगदन दिलेले आहे.

२. जाधवपूर विद्यापीठात एक मार्गदर्शकांनी ४१ संशोधकांना संशोधन कार्यात मार्गदर्शन करुन सर्वात अधिक आपले योगदान दिले आहेत.

**तक्ता क्रं. ८** : पुर्व भारतातील विद्यापीठात संशोधकांचे लिंगनिहाय वर्गीकरण –

| अनु. क्रं | राज्याचे नाव | विद्यापीठाचे नाव | संशोधकाचे लिंगनिहाय वर्गीकरण | |
|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | महिला |
| १ | ओरीसा | गंगाधर मेहर विद्यापीठ | – | ०१ |
| २ | | संबलपूर विद्यापीठ | १७ | ०८ |
| ३ | | उत्कल विद्यापीठ | ०७ | ०२ |
| ४ | पश्चिम बंगाल | जाधवपुर वि. | ४० | २३ |
| ५ | | कल्याण विद्यापीठ | १२ | ११ |
| ६ | | रविंद्र टागोर विद्यापीठ | ०५ | ०२ |
| ७ | | द युनिर्व्हसिटी ऑफ़ बुरडॉन | २३ | ०५ |
| ८ | | कलकत्ता विद्यापीठ | २२ | १० |
| ९ | | विद्यासागर विद्यापीठ | १२ | ०३ |
| | | एकुण | १३८ | ६५ |

वरील तक्त्यावरुन असे निरिक्षणास येते,

१. पुर्व भारतात पुरुष संशोधकांची संख्या सर्वाधीक १३८ आहे.

२. पुरुष व महिला संशोधकांमध्ये जाधवपूर विद्यापीठात सर्वाधीक संख्या आहे.

**निष्कर्ष** :

पुर्व भारतात ओरीसा आणि पश्चिम बंगाल या दोन राज्यातील ९ राज्य स्तरीय व १ केंद्रीय स्तरीय विद्यापीठामध्ये ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात आचार्य पदवी आहे. एकुण १० विद्यापीठापैकी ९ विद्यापीठातून २००१ ते २०२२ या कालावधीत एकुण २०३ शोधप्रबंध संग्रहीत झालेले आहे. ओरीसा राज्यात ३ व पश्चिम बंगाल राज्यात एकुण ६ विद्यापीठातून ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात आचार्य पदवी अतंर्गत संशोधन कार्य झालेले आहे. जास्तीत जास्त संशोधन कार्य इंग्रजी भाषेमधून झालेले आहे. १६३ संशोधन कार्यात एका मार्गदर्शकांनी तर ४० संशोधन कार्यात दोन मार्गदर्शकांनी आपले योगदान दिलेले आहे. संशोधन कार्यात पुरुष संशोधकांचा समावेश सर्वाधिक आहे.

**संदर्भसुची :**


१. आगलावे, प्रदीप (२०१०). *सामाजीक संशोधन पध्दती : शास्त्रे व तंत्रे.* नागपूर : साईनाथ प्रकाशन.

२. क-हाडे, बी. एम. (२०२२). *शास्त्रीय संशोधन पध्दती.* नागपूर : पिंपळापूरे ऍंड कंपनी पब्लिशर्स.

३. बोधनकर, सुधिर, अलोणी, विवेक आणि कुलकर्णी, मृणाल. (२०२१). *सामाजीक संशोधन पध्दती.* नागपूर : साईनाथ प्रकाशन.

४. निकिसे, सत्यप्रकाश. (२००७). *ग्रंथालय आणि माहितीशास्त्र : संशोधन पध्दती* (सुधारित आवृत्ती). नागपूर : प्रज्ञा प्रकाशन

५. Gulhane, S. C. (2013). *Research Methodology*, Nagpur : Prema Publishing House.

६. https://www.ugc.ac.in/oldpdf/Consolidated (24/05/2022 )

७. https://shodhganga.inflibnet.ac.in/ (03/06/2022)

८. http://hdl.handle.net/10603/357578 (19/06/2022)

९. https://shodhganga.inflibnet.ac.in/handle/10603/7762 (02/07/2022)

१०. Kumar, P. S. G. (2004). *Research Methods and Statistical Techniques* (1st ed.), Delhi : B. R. Publishing Corporation.

११. Phophalia, A. K. (2010). *Modern Research Methodology* : New Trends and Techniques (1st ed.), Jaypur : Paradise Publisheds

१२. Panigrahi, Pijushkanti. (2010). Library and Information Science Education in East and North – East India : Retrospect and Prospects. *DESIDOC Journal of Library and Information Technology*, 30 (5), September 2010, pp. 32 – 47.

१३. Universities Handbook. (2020). New Delhi: Association of Indian Universities.

१४. Upagade, Vijay and Shende, Arvind. (2015). *Research Methodology*. (1st ed.), New Delhi : S. Chand & Company Pvt. Ltd.

१५. Varalakshmi, R. S. R. (2010). Library and Information Science Education in South India : Perspective and challenges. *DESIDOC Journal of Library & Information Technology*, 30 (5), September 2010 PP.19 – 31

१६. Walia, Paramjeet Kaur. (2010). Library and Information Science Education in North India. *DESIDOC journal of Library and Information Technology*, 30 (5) PP. 9 – 18